आर.एन्.आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र.नं. – MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC Approved and Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष : दहावे अंक : दुसरा
ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०१९

**✻ संपादक ✻**
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

**✻ कार्यकारी संपादक ✻**
डॉ. शिवाजीराव देशमुख

**✻ मार्गदर्शक ✻**
डॉ. अरुण प्रभुणे

**✻ संपादक मंडळ ✻**
डॉ. सतीश कदम — डॉ. दीपक चिद्दरवार
डॉ. विजय वारकड — डॉ. महादेव वाळुंज

---

**प्रकाशक** : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
‘प्रणव’, रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५

**मुद्रक** : कॉम्पप्रिन्ट कल्पना प्रा. लि. ४१६/४ सदाशिव पेठ, पुणे ३०.

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता : डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**
‘प्रणव’, रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी : रु. ५००/–
द्विवार्षिक वर्गणी : रु. ९००/–
पंचवार्षिक वर्गणी : रु. २०००/–
अंकाचे मूल्य : रु. १२५/–

---

✻ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

✻ या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

आय.एन.आर फॉर नवी दिल्ली
र.नं. MAHMAR-35829-2010
UGC Approved and peer
Reviewed Journal

ISSN - 2229-4929

# अक्षर वाङ्मय

वर्ष – दहावे

## (विशेषांक)

रयत शिक्षण संस्थेचे

**दहिवडी कॉलेज दहिवडी, ता. माण, जि. सातारा.**

दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

आंतरराष्ट्रीय परिषद – दि. १९ व २० डिसेंबर २०१९

# मराठी साहित्यातील लिंग, जात व धर्म विषयक समता – विषमता

**प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव**
दहिवडी कॉलेज दहिवडी

**प्रा. ए. एन. दडस**
समन्वयक

**प्रा. डॉ. बी. एस. बळवंत**
संयोजक

**प्रा. मीरा देठे**
प्रमुख मराठी विभाग

**प्रा. डॉ. बी. एस. वाघमोडे**
मराठी विभाग

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | महात्मा बसवण्णांच्या वचनसाहित्यातील विषमताविरोधी विचार | डॉ. दत्ता पाटील | ९ |
| २) | प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील सामाजिक विषमतेचे चित्रण | प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १३ |
| ३) | तथागत गौतम बुद्धांचे समतेचे विचार व कार्य | प्रा. डॉ. सुभाष वाघमारे | १६ |
| ४) | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री शोषणाचे चित्रण | डॉ. दत्तात्रय बारबोले | २२ |
| ५) | दलित साहित्यातील विषमतेचा हुंकार | डॉ. प्रतिभा जाधव-निकम | २५ |
| ६) | आदिवासी कादंबरीतील विषमतेची चित्रण | डॉ. के. के. पवार | २८ |
| ७) | बारोमास वास्तवतेचे जिवंत चित्रण | डॉ. मेघमाला मेश्राम | ३४ |
| ८) | संताची संमतेची गुढी | डॉ. दत्तात्रय डुंबरे | ३८ |
| ९) | भटक्या विमुक्त पारधी साहित्यातील सामाजिक विषमतेचे चित्रण | प्रा. अनिल बांगर | ४१ |
| १०) | श्रीराम दुर्गे यांच्या क्षितीजापलिकडचा सुर्य | डॉ. संजय पाटोळे | ४७ |
| ११) | ग्रामीण कादंबरीतील लिंग व्यवस्थेतून चित्रीत झालेली विषमता | डॉ. वाघमोडे एस. बी. | ५९ |
| १२) | तुकाराम : सामाजिक विषमतेवर प्रहार करणारा योध्दा संत | डॉ. मानसी लाटकर | ६२ |
| १३) | संघर्षमय जीवनाची कहाणी उचल्या आत्मकथन | डॉ. कांचन नलावडे | ६८ |
| १४) | दलित आत्मकथनाचा परिपेक्षातून भटक्या जमातीच्या | डॉ. शैलजा शिंदे | ७० |
| १५) | दलित साहित्यातील सामाजिक समतेचे व विषमतेचे चित्रण | डॉ. विजया पाटील | ७५ |
| १६) | मराठी दलित कवितेतील विषमतेचे चित्रण | डॉ. आनंदा वारके | ७९ |
| १७) | महानुभव पंत यांच्या मौखिक परंपरा – काही निष्कर्ष | डॉ. बाळकृष्ण लळित | ८३ |
| १८) | संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील विज्ञान | डॉ. दीपक सुभाषराव सुर्यवंशी | ८६ |
| १९) | जागतिकीकरणातील सामाजिक व शैक्षणिक विषमता | डॉ. डी. बी. सोळुंके | ९० |
| २०) | दलित साहित्यातील विषमतेचे चित्रण | डॉ. शकुंतला एम. भारंबे | ९३ |
| २१) | आदिवासी साहित्यातील विषमतेचे चित्रण | प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ | ९६ |
| २२) | माडगुळकरांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण | प्रा. बाळासोा सुतार / आशा विठ्ठल सुतार | ९८ |
| २३) | 'कोल्हाट्याचे पोर' या आत्मकथनातील विषमतेचे चित्रण | प्रा. सर्वगोड एन.सी. | १०२ |
| २४) | दलित साहित्यातील सामाजिक समतेचे चित्रण | श्री. राहूल भागवत गायकवाड | १०५ |
| २५) | जात – धर्म – लिंगभाव एक दृष्टीकोण | प्रा. एम. के. शिंदे | १०९ |
| २६) | ग्रामीण साहित्यातील धर्म जात व लिंग आधारित विषमतेचे चित्रण | प्रा. निलेश मधुकर लंगोटे | ११४ |
| २७) | सुबोध जावडेकरांच्या गुगली आणि आकाश भाकिते ..... | डॉ. सचिन गंगाधर गिरी | ११७ |
| २८) | स्त्रीवाद साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित .... | प्रा. सोनवणे राहूल बापुराव | १२० |
| २९) | चित्रा कादंबरीतील स्त्री दर्शन | डॉ. माने हनुमंत तुकाराम | १२३ |
| ३०) | भटक्या विमुक्त विषमतेचे चित्रण | डॉ. अतुल नारायण चौरे | १२६ |
| ३१) | दलित साहित्यातील धर्म, जात व लिंग विषमतेचे चित्रण | डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | १३० |
| ३२) | स्त्रीवादी साहित्यातील विषमतेचे चित्रण | कु. निकिता अनिल शेंडगे | १३६ |
| ३३) | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | प्रा. सचिन पोपट सवने | १३८ |
| ३४) | स्त्रीवादी साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित .... | डॉ. जगदाळे किरण आगतराव | १४३ |
| ३५) | सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या दैन्यावस्थेचा दाहक अविष्कार .... | डॉ. दादाराव एकनाथ गुंडरे | १४६ |
| ३६) | अंतर्गत मानसिक पडझडीचे चित्रण करणारी मराठी प्रायोगिक कथा | डॉ. युवराज देवाळे | १४९ |
| ३७) | दलित कवितेतील सामाजिक विषमतेचे व समतेचे चित्रण | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | १५२ |
| ३८) | जागतिकीकरणानंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील सामाजिक .... | डॉ. एन. व्ही. शिंदे | १५९ |
| ३९) | दलित संत चोखामेळा व रोहिदास यांच्या काव्यातून अभिव्यक्त | श्री. राहूल विनोदराव राऊत | १६२ |
| ४०) | आदिवासी कादंबरीतील सामाजिक विषमता | प्रा. विनायक राऊत | १६५ |
| ४१) | जागतिकीकरणाचा नंतरच्या मराठी साहित्यातील समतेचे .... | प्रा. सुरवसे तुकाराम नागनाथ | १७० |
| ४२) | वर्तमान समाजव्यवस्थेतील विषमता वळवाचे पाणी | डॉ. जयदेवी पवार | १७३ |
| ४३) | ग्रामीण साहित्य कृती 'तहान मधील मुल्यात्मक संघर्ष | डॉ. विजय झुंजाराव | १७५ |
| ४४) | कविता महाजन यांच्या कादंबरीतील विषमतेचे चित्रण | डॉ. सुवर्णा नामदेव पाटील | १७९ |
| ४५) | जागतिकीकरणात उत्तम कांबळे यांच्या कविता | डॉ. शशिकला भिमराव रणदिवे | १८२ |
| ४६) | स्त्रीवादी साहित्यातील विभावरी शिरुरकर, ताराबाई शिंदे ..... | सौ. कुंभार शुभांगी तानाजी | १८९ |
| ४७) | दलित साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित ..... | डॉ. आचार्य आर. डी. | १९२ |
| ४८) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर –एक स्त्री उध्दारक | प्रा. मीरा माधवराव देठे | १९४ |
| ४९) | 'मरणकला' आत्मकथनातील स्त्री चित्रण | प्रा. मीरा माधवराव देठे | १९९ |
| ५०) | दलित कथेतील राजकीय विषमतेचे चित्रण | डॉ. मधुकर बैकरे | २०१ |
| ५१) | मराठी कवितेतील धर्म, जात व लिंग विषयक विषमतेचे चित्रण | डॉ. जनार्धन दामू परकाळे | २०५ |
| ५२) | दलित साहित्यातील प्रश्न व समस्या | डॉ. भरत भिमराव जाधव | २०९ |

# जागतिकीकरणानंतरच्या मराठी ग्रामीण कवितेमधील सामाजिक विषमतेचे चित्रण

## (विशेष संदर्भ 'बोलावें ते आम्ही'—श्रीकांत देशमुख)

**Social Digressiveness in Marathi rural Poetry after Globalization**

(Special reference of Bolave Te Aamhi by Shrikant Deshmukh )

**डॉ. एन.व्ही. शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्न
ई संवाद ९८५०१२५५८४
ई मेल shindenamdeo77@gmail.com

**ABSTRACT:**

जागतिकीकरणानंतर संपूर्ण समाज आणि साहित्यविश्व ढवळून निघाले. खाऊजा व्यवस्थेचा थेट परिणाम अर्थकारण, राजकारण यांच्यासह वाङ्मयविश्वावरही झाला. परिणामी यामधून निर्माण झालेल्या प्रश्नांचे, समस्यांचे, विषमतेचे चित्रणही साहित्यामध्ये आलेजागतिकीकरणामधून निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेला विविध अंगे आहेत. त्यामध्ये गरिब, श्रीमंत, भांडवलदार, व्यापारी, शहर, खेडे, उच्च शिक्षित, निरक्षर, कुणबी आणि कुणबेत्तर असे अनेकविध वर्ग निर्माण होऊन ते बळकट झाले. या वर्गामधून समाजाचा समतोल ढासळला. त्यातून प्रश्नांची निर्मिती होत गेली. भौतिक साधन सुविधांपलिकडे मानवी जीवन जाऊ शकले नाही. याचा सर्वाधिक प्रभाव शेती, शेतीची अर्थव्यवस्था, शेतकरी यांच्या जीवनावर झाला. परिणामी ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी असलेल्या शेतकऱ्यांची व शेतीची स्थितीचे चित्रणही आपोआप साहित्यामध्ये आले.

**KEYWORDS:**

ग्रामीण साहित्य, जागतिकीकरण, जागतिकीकरणानंतरचे साहित्य, जागतिकीकरणानंतरची मराठी ग्रामीण कविता, श्रीकांत देशमुख, बोलावें ते आम्ही, नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कविता इ.

**INTRODUCTION:**

१९९० नंतरच्या कालखंडामध्ये जागतिकीकरणाचा प्रभाव सर्वदूर क्षेत्रांमध्ये पसरला होता. त्यामधून साहित्यविश्व वेगळे नव्हते. ग्रामीण साहित्यामध्ये शेती आणि शेतकरी केंद्रस्थानी होता; आणि याच शेतकऱ्याच्या व शेतीच्या आयुष्यामध्ये जागतिकीकरणाने अमूलाग्र बदल घडवून आणले. त्यामुळे नव्वदोत्तर कालखंडातील लेखकांनी त्याच्या प्रभाव चित्रणास सुरूवात केली. केवळ प्रभाव चित्रण हे ध्येय न मानता, जागतिकीकरणामुळे सबंध शेतकरी जीवन कसे बदलून गेले. त्याच्या जीवनामध्ये निर्माण झालेली विषमता, त्या विषमतेची बीजे यांचीही चिकित्सा होऊ लागली. याच पार्श्वभूमीवर श्रीकांत देशमुख यांनी लिहिलेला 'बोलावें ते आम्ही' हा काव्यसंग्रह आणि त्यामधील सामाजिक विषमतेचे चित्रण आणि त्याची उकल संशोधन लेखाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे.

**OBJECTIVES:**

नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितांचा पिंड समजून घेणे. जागतिकीरणाच्या प्रभावाने साहित्यामध्ये झालेले बदल निर्दशास आणणे. श्रीकांत देशमुखांच्या 'बोलावें ते आम्ही' या काव्यसंग्रहामध्ये चित्रित झालेले सामाजिक विषमतेचे चित्रण स्पष्ट करणे. सामाजिक विषमतेमधून निर्माण झालेले प्रश्न निदर्शनास आणून त्यावर उपायांच्या अनुषंगाने विश्लेषण व भूमिका मांडणे. जागतिकीरणाचा सबंध मानवी जीवनाशी असलेला अनुबंध लक्षात आणून देणे. या विविध उद्‌दिष्टांचा विचार केंद्रस्थानी असणार आहे.

**METHODOLOGY:**

प्राथमिक माहिती स्त्रोत आणि दुय्यम माहिती स्त्रोत या पद्धतीमधील विविध घटकांचा आवश्यक तिथे वापर केला जाईल. संशोधन लेखासाठी दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर केला आहे. त्यामध्ये ग्रंथालयामधील पुस्तके, इंटरनेट, विविध वर्तमानपत्रे आणि वेबसाईट यांचा वापर प्रामुख्याने माहिती संकलन आणि विश्लेषण यासाठी केला

आहे.

**SIGNIFICANCE AND RELEVANCE:**

जागतिकीकरणानंतर समाजाच्यामध्ये विकासाच्या आणि भौतिक सुविधांच्या नावाखाली निर्माण झालेल्या विविध प्रकारांच्या सामाजिक विषमतांचा विचार नव्वदोत्तरी साहित्यामध्ये प्रभावीपणे चित्रित झाला आहे. त्याची उकल करून ती समाजमनापर्यंत या विषमतेच्या मुळांची चर्चा घडवून आणणे हे आजच्या काळामध्ये खूप संयुक्तिक आहे. त्यामधूनच या सामाजिक विषमता कमी होण्यास किंवा समूळ नष्ट होण्यास मदत होणार आहे. म्हणूनच या संशोधन लेखाचे महत्त्व वाढते.

**ANALYSE:**

श्रीकांत देशमुख यांनी 'बोलावें ते आम्ही' या काव्यसंग्रहामध्ये जागतिकीरणानंतरचे खेडे, कृषिजन संस्कृती, गावगाडा यांचे प्रभावी चित्रण केले आहे. या चित्रणामध्ये जागतिकीरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिवर्तनाची थेट नोंद घेतलेली आहे. परंतु जागतिकीकरणाच्या प्रभावाची उकल करताना बहुसंख्येने यामधून निर्माण झालेले प्रश्न, समस्या यांचे चित्रण दिसते. जागतिकीकरणाने केवळ मानवाला भौतिक सुख बहाल केले. यापलिकडे या जागतिकीरणाचे तोटेच मनुष्य जीवनाला भोगावे लागत आहेत. खेडयामध्ये कंगालपणा वाढत गेला, मानवी मूल्ये आणि नैतिकता यापेक्षाही मानवाचे यांत्रिकीकरण होऊ लागले. वस्तूकरण, चंगळवाद यांची मिरासदारी समाजामध्ये वाढली. यामुळे शेती व मातीचे चित्र बदलले. मानवी मूल्यांपेक्षा आणि माणुसकीपेक्षा आर्थिकता, स्वयंकेंद्रित वृत्ती अधिक प्रभावी झाली. याचे चित्रण त्यांच्या कवितांचा मध्यवर्ती गाभा ठरला. देशमुखांना स्वानुभवातून जे जाणवले, त्यांनी जे भोगले तेच त्यांच्या कवितेमध्ये आले. म्हणूनच त्याला प्रामाणिकपणाची, स्वानुभवाची धार आहे जागतिकीरणाने केवळ समाजामध्ये प्रश्न आणि समस्यांची निर्मिती केली असे नाही; तर मानवी जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचे बनविले. अनेक प्रकारांच्या विषमता समाजामध्ये निर्माण झाल्या. गरिबी, श्रीमंती, चंगळवादी, श्रमवादी, स्वार्थी, भौतिक सुविधावादी, भांडवलदार, मजूर, भूमिहीन, जात, धर्म यांच्यामध्ये अधिकच खोल दरी निर्माण झाली. या वाढत चाललेल्या विषमतेमुळे समाजमन कलुषित झाले. मानवता संपत चालली.

समाजात केवळ भौतिक सुविधांचा वास दरवळत आहे. त्यामध्ये माणुसकीची झालर दिसत नाही. गावखेडयाची संस्कृती, रीतिभात पूर्ण बदलून गेली. हे सांगताना कवी म्हणतात, 'पुलावरूनच आले चालत माणिकचंद स्टार गोवा ऐतिहासिक गुटखे गावोगाव समूह संस्कृतीचे प्रतीक असणाऱ्या पानठेल्यावर' ही सद्यस्थिती आहे. जागतिकीरणातून केवळ भौतिक घटकांमध्ये विषमता पेरली नाही; तर त्या विषमतेचे मूळ अभौतिक घटकांपर्यंत पोहचले आहे. याचाच परिपाक म्हणून, बदलती अर्थव्यवस्था, नीतीव्यवस्था, कुणबी कष्ट, भूमीबद्दलची भावना, शेती व शेतकरी जीवनाकडे पाहण्याची दृष्टी यांमध्येही बदल झाला. कुटुंबपद्धतीचा ऱ्हास, गावगाड्याचा ऱ्हास, माणुसकीचा ऱ्हास या सर्व घटकांमधील ऱ्हासप्रक्रिया जागतिकीकरणामध्ये दिसते आहे. विषमता नावाची गोष्ट सर्वांना चिटकून ठेवण्याचे श्रेय जागतिकरणाला त्यांमधील धोरणांना जाते. निसर्ग, शेती, स्त्री, पशुधन यांच्याकडे आधुनिक तंत्रयुगामध्ये आत्मीय भावनेने कोणी पाहत नाही. भावनांची जाण, माणुसकीची कदर आणि सहृदयता या गोष्टी जागतिकीरणामधून निर्माण झालेल्या विषमतेने गिळंकृत केल्या आहेत. 'गावात शिरताना', 'पांडुरंग सदाशिव साने', 'एका गावाची गोष्ट' यांसारख्या अनेक कवितांमधून जागतिकीरणाच्या प्रभावाने पीडित असलेल्या शेती, माती आणि एकंदरीत मानवी जीवनाचे चित्रण प्रकर्षाने येते. 'नवा करार', 'उजळमाथ्यानं भूमिपुत्र' या कवितांमधून भौतिक विकासामधील फोलपणा, मनुष्य स्वभावातील वाढता स्वयंकेंद्रितपणा, तंत्रज्ञान युगामधील भूमिपुत्रांची झालेली दयनीय अवस्था, जगण्यामधील अस्थितरता प्रकट होते. कवी म्हणतात, 'तो पुटपुटतो एंडोसल्फान, रोगोर, नवाक्रान, थायमेट यापैकी कशानंच नाही मरणार इथली भूमी कुरतडणारी वाळवी आणि उभं पीक फस्त करणारी टोळधाड जांघेला असते चिकटलेली कणकवली, सावंतवाडी कोकणातल्या वणव्यात बुडालेली टाकतो थुंकुन तो जागतिकीकरणाचे सारे संदर्भ तंबाखू खाऊन थुंकल्यासारखे म्हणतो गहिवरून, या सागरी वाऱ्यानं जावं पाऊस होऊन कोरड्या माळरानावर देशोदेशी बहरावीत झाडं भजनासारखी माणसांना फुटावेत ओले अंकुर पानोपानी' अशी मागणी

होते. या मागणीपाठीमागे जागतिकीकरणाचे खोल संदर्भ दडले आहेत. त्याचा परिणाम शेतीव्यवस्थेवर आणि कृषिजनांच्या संस्कृतीवर किती भयावह झालेले आहेत त्याची कल्पना येते. म्हणून या कवितांमधील जागतिकीकरणाने निर्माण केलेली विषमता लक्षात घेऊन सकारात्मक परिवर्तन घडविल्यास कृषिजनांच्या संस्कृतीमध्ये नव चैतन्य निर्माण करता येऊ शकेल. अन्यथा हा ऱ्हास उत्तरोत्तर कालखंडामध्ये वाढत जाईल हे नक्की आहे.

**FINDINGS :**

नव्वदोत्तरी ग्रामीण मराठी कवितांमधून वास्तववादी जीवनाचे चित्रण येते. श्रीकांत देशमुख यांच्या 'बोलावे तें आम्ही' या काव्यसंग्रहामधून जागतिकीकरणानंतरचे खेडे, गावगाडा आणि तेथील भाषा, समाज आणि संस्कृती संकराचे प्रभावी व वास्तव चित्रण सजगतेने येते. केवळ चित्रणावर ही कविता अवलंबून राहिली नाही; संबंधित प्रश्नांची चिकित्सा केलेली दिसते. या चिकित्सेमधून मानवी जीवनामधील प्रश्नांची उकल होण्यास मदत होणार आहे.

**CONCLUSION and RECOMDITIONS:**

जागतिकीरणारचे शेती व शेतीच्या अर्थव्यवस्थेवरील नकारात्मक परिवर्तन लक्षात घेता. त्यामध्ये फेरविचार करणे गरजेचे आहे. केवळ वास्तववादी चित्रण नव्वदोत्तरी कवितांमध्ये येते; इथपर्यंत न थांबता त्यामधील चिकित्सेतून समस्यांच्या उपायांचा शोध घेऊन. त्या अनुषंगाने समाज परिवर्तन करण्यासाठी कृतिशील होणे गरजेचे आहे.

**REFERENCE :**

१. देशमुख, श्रीकांत, बोलावें ते आम्ही, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, पहिली आवृत्ती २०१३
२. शिंदे, (प्रा.) नामदेव, अनुप प्रकाशन सोलापूर, प्रथमावृत्ती २०१४